आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ मे २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धिदर गाठल्याचा रिझर्व बँकेचा अहवाल
- यंदाच्या मान्सूनमधे सरासरीच्या ९० टक्के पावसाचा अंदाज
- आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल असा मुख्यमंत्र्यांना  विश्वास
- विधानपरिषद निवडणुकीसाठी  महाविकासआघाडीचा १५ जागांबाबत निर्णय, दोन जागांबाबत चर्चा सुरू

**आणि**

- कुस्तीपटू विनेश फोगटला आशियाई क्रीडास्पर्धांसाठी निवडचाचणीत  भाग घेता येईल असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

<><><><><>

जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धीदर गाठल्याचं रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. २०२५-२६चा वार्षिक अहवाल भारतीय रिझर्व बँकेनं आज प्रसिद्ध केला. सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं या वर्षातही कायम राखलं. जागतिक स्तरावर इंधन दरवाढ, पुरवठा साखळीतले व्यत्यय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या समस्या ही आव्हानं असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी असल्यानं पुढच्या काळात आर्थिक वाढीला चालना मिळेल, असं अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ मधे महागाई दर ४ टक्क्यावर रोखण्याचं उद्दिष्ट अहवालात नमूद केलं आहे.

थेट लाभ हस्तांतरण योजनांचा निधी डिजिटल चलनाच्या स्वरुपात वितरित करण्याचा विचार असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

२०२५-२६ या वर्षात आर्थिक फसवणुकीची १० हजार ११४ प्रकरणं उघडकीस आली, त्यात सुमारे ४८ हजार २१ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती, अशी माहिती अहवालात दिली आहे.

**<><><><>**

यंदा जून ते सप्टेंबरच्या कालावधीत होणारा मोसमी पाऊस सरासरीच्या ९० टक्केच पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. नवी दिल्लीत आज मान्सून हंगाम २०२६च्या दुसऱ्या टप्प्यातील दीर्घकालीन हवामान अंदाजाविषयी विभागाचे संचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी माध्यमांना माहिती दिली. एल निनो परिस्थितीमुळे देशात यंदाचा नैऋत्य मान्सून दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. या हंगामात भारतातल्या पावसाच्या स्थितीबद्दल ते यावेळी म्हणाले...

**होल्ड... बाईट - मृत्युंजय मोहपात्रा**

येत्या जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><>**

आगामी काळात महाराष्ट्र केवळ भारतातच नव्हे तर जगात एआयचं नेतृत्व करेल," असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबईत 'मुंबई टेक विक २०२६' च्या उद्घाटन प्रसंगी आयोजित मुलाखतीत बोलत होते. मुंबईची आर्थिक ताकद, तंत्रज्ञान कौशल्य, मजबूत स्टार्टअप परिसंस्था आणि नवतंत्रज्ञान स्वीकारण्याची  तयारी यामुळे महाराष्ट्र एआय क्रांतीचं नेतृत्व करण्यासाठी अत्यंत सक्षम स्थितीत आहे, असं ते म्हणाले.

मुंबई टेक वीकमध्ये सहभागी झालेल्या देश-विदेशातल्या स्टार्टअप्स आणि तंत्रज्ञान कंपन्यांना, महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. राज्य शासन केवळ इनक्युबेशन आणि अॅक्सेलरेशनपुरतं मर्यादित नसून ‘फंड ऑफ फंड्स’च्या माध्यमातून गुंतवणूक सहाय्यही देत आहे. शासन भागीदार म्हणून तुमच्या सोबत उभं राहायला तयार आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उद्योजक, गुंतवणूकदार आणि जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

<><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरण हे अतिशय गंभीर असून आता २१ जून रोजी होणारी पुनर्परीक्षा सुरळीतपणे व्हावी ही सरकारची जबाबदारी असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले. नवी दिल्लीत ते दूरदर्शनशी बोलत होते. आता होणाऱ्या परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत एकही चूक होऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे, असं धर्मेंद्र प्रधान म्हणाले. पेपरफुटी प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आलं असून दिवसेंदिवस त्यात नवनवीन खुलासे होत आहेत. त्यामुळे या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असं प्रधान म्हणाले.

<><><><><>

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं, नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत २२ जूनपर्यंत वाढवली आहे. आधी ही मुदत २६ मे पर्यंत होती. मात्र, नोंदणी केलेल्या २३ लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ १३ लाख विद्यार्थीच त्या मुदतीत तपशील सादर करू शकले होते.

त्या अनुषंगानं ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप तपशील सादर केले नाहीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणं सुलभ व्हावं या उद्देशानं ही मुदतवाढ दिल्याचं एनटीएनं स्पष्ट केलं.

<><><><><>

देशभरातल्या उच्च न्यायालयांनी प्रलंबित खटल्यांवरचे आदेश, राखून ठेवल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जाहीर करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. खटल्याच्या सुनावणीत होणाऱ्या विलंबामुळे पक्षकारांचं होणारं नुकसान लक्षात घेऊन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं हा निर्णय घेतला. वैयक्तिक स्वातंत्र्यासंबंधीच्या खटल्यांमध्ये जलदगतीनं निर्णय होण्याची आवश्यकता असल्याचंही सर्वोच्च न्यायालयानं अधोरेखित केलं. जामीन अर्जांवरचे आदेश त्याच दिवशी जाहीर करावेत, जर ते राखून ठेवले असतील तर दुसऱ्या दिवशी जाहीर करून न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत. जामीन किंवा शिक्षेच्या निलंबनाचा आदेश जारी होताच तो संबंधित तुरुंग प्रशासनाला कळवून त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

<><><><><>

विधान परिषदेसाठीच्या १७ पैकी १५ जागांबाबत महाविकास आघाडीचा निर्णय झाला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत बातमीदारांना ही माहिती दिली. तर दोन जागांवर अद्याप चर्चा सुरू असून येत्या दोन दिवसात याबद्दल निर्णय घेऊ, असं सपकाळ म्हणाले.

चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा-गोंदिया, धाराशिव, अहिल्यानगर, सोलापूर, अमरावती, बीड- लातूर या आठ जागांवर तर पोटनिवडणूक असणाऱ्या नागपूर इथे काँग्रेस उमेदवार देणार आहे. रायगड रत्नागिरी, जळगाव, परभणी-हिंगोली, संभाजीनग, या

ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार असतील. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार पुणे, ठाणे, सांगली-सातारा इथून उभे राहणार आहेत.

<><><><><>

ड्रोनच्या माध्यमातून शस्त्रांच्या तस्करीविरोधात एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेने आज महाराष्ट्रासह, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि बिहारमधल्या एकूण १२ ठिकाणी छापे टाकले. ड्रोनच्या माध्यमातून भारतात मोठ्या प्रमाणावर शस्त्रं, दारुगोळा आणि आयईडी पाठवल्याचा संशय असणाऱ्या जसवीर चौधरी आणि त्याच्या काही सहकाऱ्यांसंबंधात ही कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईत डिजिटल उपकरणं, कागदपत्रं आणि संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आलं असून त्याची तपासणी सुरू आहे.

<><><><><>

शारजाहून पेट्रोलियम घेऊन भारताकडे निघालेल्या ‘निसोस केरॉस’ या तेलवाहू जहाजाने होर्मूझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली असून ते ३ जून रोजी विशाखापट्टण बंदरात पोचेल. जहाजांच्या वाहतुकीचा माग घेणाऱ्या काही संस्थांच्या माहितीनुसार हे जहाज आज सकाळी भारताच्या पश्चिम किनाऱ्याजवळ पोचलं होत.

<><><><><>

कुस्तीपटू विनेश फोगटचा आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तिला आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी ३० आणि ३१ मे रोजी होणाऱ्या निवड चाचणीत सहभागी होण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने आज दिली.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. विनेशला निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची

परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देत 'भारतीय कुस्ती महासंघा'ने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना खंडपीठाने हा निर्णय दिला.

आजच्या या टप्प्यावर, उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर, विनेशच्या आशा आणि अपेक्षा उंचावल्या आहेत. तिला 'घरी परत जा, आम्ही काहीही करू शकत नाही' असं सांगणं योग्य ठरणार नाही, असं खंडपीठानं कुस्ती महासंघाच्या वकिलांना सांगितलं.

//<><><><><>//